# सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील पुढील सुनावणी २४ जूनला

बीड (सरकार) मस्साजोग सरपंच देशमुख यांच्या हत्येला सहा महिने उलटून देखील यातील आरोप कृष्णा आंधळे अद्यापही फरार असल्याने पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने बीड जिल्ह्यासह महाराष्ट्र हादरला होता,या हत्येतील मुख्य आरोपी वाल्मीक कराडसह इतर आरोपी सध्या बीड जिल्हा कारागृह असून याने या दोषआरोपा मधून मला



दोषमुक्त करावे असा अर्ज वाल्मीक कराडच्या वकिलाने न्यायालयात केला होता त्या सुनावणीसह विष्णू चाटेने लातूर कारागृहातील बीड कारागृहात आणण्यासाठी अर्ज केला होता, वाल्मीक कराडची संपत्ती जप्त करण्यासह इतर सुनावणी देखील आज न्यायालयात होणार होती परंतु न्यायाधीश रजेवर असल्यामुळे ही सुनावण २४ जून रोजी होणार आहे.

बीड शहरात राष्ट्रवादीच्या एकाच्या वाढदिवसानिमित्त देशमुख हत्यांमध्ये मुख्य आरोपी असलेले वाल्मीक कराड चे फोटो बॅनरवर झळकल्याने याची चर्चा जिल्हाभर होत असून पोलीस प्रशासन किती निर्भीस्त आहे.याचे हे उत्तम उदाहरण पहावयास मिळाले. यामुळे वाढदिवसानिमित्त बॅनर लावणारा वर व पोलीस प्रशासनावर रोष व्यक्त होत असून बॅनर फोटो लावणाऱ्याच्या घरातील व्यक्ती सोबत असे झाले असेल तर फोटो लावले असते का? असा सवाल धनंजय देशमुख यांनी केला. बीड जिल्हा कारागृहात असलेले आरोपीला वेगवेगळ्या कारागृहात ठेवावे अशी देखील मागणी धनंजय देशमुख यांनी न्यायालयात अर्ज केली आहे. देशमुख हत्येतील आरोपींना फाशी शिक्षा देण्यात यावी, सहा महिन्यापासून फरार कृष्णा आंधळेला अटक करण्यात यावी, कृष्णा आंधळे पासून देशमुख कुटुंबीयांना धोका त्याची देखील भीती धनंजय देशमुख यांना व्यक्त केली.यामुळे मस्साजोग येथील गावकरी हे उपोषणाच्या तयारीत आहेत.

सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २६३ वा ■ मंगळवार १७ जून २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक १८ जून २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 263 ■ Tuesday 17 June 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027

# भाजपसोबत गेलेल्या संधीसाधूंना सोबत घेऊ शकत नाही

## शरद पवारांच्या वक्तव्याने अजितदादा गटासोबतच्या युतीच्या चर्चेला ब्रेक

पुणे (सरकार): सगळ्यांना बरोबर घेतलं पाहिजे, असे वारंवार म्हटले जात आहे. पण सगळे म्हणजे कोण? गांधी, नेहरु, फुले, शाहू, आंबेडकर विचारांचे असले तरी त्यांना सोबत घेऊ. पण जे सत्तेसाठी भाजपसोबत गेले, ही भूमिका कोणी मांडत असेल तर हा विचार काँग्रेसचा नाही. कुणाशीही संबंध ठेवा पण भाजपशी संबंध हा काँग्रेसचा विचार असू शकत नाही. त्यामुळे अशा पद्धतीने संधीसाधूपणाचं राजकारण आपल्याला प्रोत्साहित करायचं नाही, त्या दिशेने आपल्याला पावलं टाकायची नाहीत, असे शरद पवार यांनी म्हटले. ते मंगळवारी पिंपरी-चिंचवड येथील एका कार्यक्रमात बोलत होते. शरद पवारांच्या या वक्तव्यामुळे राष्ट्रवादीतील दोन्ही गट एकत्र येण्याच्या आशा मावळल्याची चर्चा सुरु झाली आहे.

आगामी पालिका निवडणुकीसाठी नव्या नेतृत्वाची फळी निर्माण करावी लागणार आहे. या नव्या फळीच्या मार्फत आपल्याला बदल घडवावा लागेल. आज आपल्याला हे चित्र बदलावे लागणार आहे. विकास असा करायचा आहे, ज्यातून भावी पिढीने प्रेरणा घ्यायला हवी. यासाठी संघटन मजबूत करावी लागेल. जे गेले त्यांची चिंता करू नका. मी असे अनेक प्रसंग पाहिले आहेत. माझ्यासोबतच्या अनेक सहकाऱ्यांनी साथ सोडली, पण ज्या-ज्यावेळी असं घडलं, तेव्हा मी चिंताग्रस्त झालो नाही. मला कार्यकर्त्यांनी खंबीर साथ दिली आणि जनतेने पाठिंबा दिला. त्यानंतरही मी सत्तेत आलेलो आहे. त्यामुळे कोण आला, कोण गेला याची चिंता करु नका. लोक शहाणे आहेत, आज ही



लोकशाही जनतेच्या शहाणपणाने टिकलेली आहे. ती यापुढं ही टिकून राहणार आहे, असे शरद पवार यांनी सांगितले. तुम्ही निवडणुकीची काळजी करु नका. आपल्यासोबत जो येणार असेल, ते आपल्या विचारांशी जोडून राहणार असतील तर त्यांचा विचार वरिष्ठ करतील. मी तुम्हाला विश्वास देतो. आगामी महापालिका निवडणुकीबाबत तुम्ही चिंताच करू नका, असे सांगत शरद पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना धीर देत त्यांना लढण्यासाठी बळ देण्याचा प्रयत्न केला. रांजणगावला ही आम्ही औद्योगिक नगरी बनवलं. चाकण, बारामती, इंदापूर, अशा अनेक ठिकाणी औद्योगिक पट्टा निर्माण केला. पिंपरी चिंचवडच्या आजूबाजूला हे औद्योगिक आणण्यासासाठी आम्ही झटलो. आज स्थिती वेगळी आहे. आता इथलं राजकारण, समाजकारण बदललं आहे. इथलं नेतृत्व अण्णासाहेब मगर, मग आम्ही, त्यानंतर रामकृष्ण मोरे यांनी या शहराचा चेहरा बदलण्यासाठी कष्ट घेतले. यामागे गांधी-नेहरूंचे विचार महत्वाचे ठरले. त्यांनी विकासाची गंगा आणली अन हीच विकासाची गाडी आपल्याला पुढं न्यायची आहे.

जी अनधिकृत बांधकाम आहेत, ती टिकायला हवीत. नव्यानं अनधिकृत बांधकामे होऊ देऊ नका, पण जी पूर्वी झालीत ती टिकायला हवीत. रस्त्याच्या पलीकडे एक अन अलीकडे एक असा एक नवा व्यवसाय पिंपरी चिंचवडमध्ये सुरु झाला. हा व्यवसाय आपल्याला स्वच्छ करायचा आहे, असे शरद पवार यांनी म्हटले.

# धनंजय जगताप यांचा समर्थकांस राष्ट्रवादी काँग्रेस श.प.पक्षात प्रवेश

## आ.संदीप क्षीरसागरांनी केले नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे स्वागत

बीड (सरकार): राजकारण आणि समाजकारणात सातत्याने सक्रिय असलेले, बीड पंचायत समितीचे माजी उपसभापती अरूण जगताप यांचे सुपुत्र धनंजय जगताप यांनी आपल्या अनेक समर्थकांसह, आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला.

बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे मंगळवारी (दि.१७) रोजी धनंजय जगताप यांचा पक्षप्रवेश कार्यक्रम पार पडला. यावेळी धनंजय जगताप यांनी आपल्या अनेक कार्यकर्ते आणि समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश





घेतला. यावेळी नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे आ.संदीप क्षीरसागरांनी स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# महिलेचं तोंड दाबून गळ्यातले दागिने ओरबाडले

## पतीच्या डोक्यात धारदार शस्त्रानं वार

बीड (सरकार): जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात घडलेल्या दोन घटनांनी संपूर्ण बीड जिल्हा हादरलाय .वारंवार होणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे गेल्या अनेक महिन्यांपासून बीड जिल्हा चर्चेत आहे . दिवसाढवळ्या होणाऱ्या हत्या, शस्त्राचा धाक दाखवून होणारी मारहाण, दरोडे, लैंगिक अत्याचार अशा घटना जिल्ह्यातून वारंवार समोर येत आहेत . दरम्यान शिरूर तालुक्यातील मानूर जवळील तुपे वस्तीवर मध्यरात्रीच्या सुमारास दरोडेखोराने सशस्त्र दरोडा टाकत पती-पत्नीला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे .आजूबाजूच्या घरांना बाहेरून कड्या लावत भगवान तुपे यांच्या घराचे दार तोडूनच प्रवेश केला .त्यांच्या पत्नीचे तोंड दाबून गळ्यातील मंगळसूत्र ओरबाडले . नंतर पतीच्या डोक्यातही धारदार शस्त्राने वार करून डोके फोडले . गळ्यातील मंगळसूत्रासह घरातील दोन तोळे दागिने घेऊन चोरटे पसार झाले.महिलेच्या पाकिटातील रोख दहा हजार रुपयेही चोरट्यांनी लंपास केले .या संपूर्ण घटनेने परिसरात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे

बीडच्या शिरूर तालुक्यातील मानूर जवळील हनुमानवाडी येथील तुपे वस्तीवर मध्यरात्री एक ते दीड वाजण्याच्या दरम्यान दरोडेखोराने सशस्त्र दरोडा टाकला. यावेळी पती पत्नीला बेदम मारहाण करून लुटमार केली. या घटनेत भागवत तुपे यांच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करण्यात आला असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.मध्यरात्री तीन चोरांनी तुपे वस्तीवरील आजुबाजूच्या घरांना बाहेरून कड्या लावून भागवत तुपे यांच्या घराचे दार तोडून आत प्रवेश केला. या वेळी भागवत तुपे यांच्या पत्नी सरस्वती यांचे तोंड दाबून गळ्यातील मंगळसूत्र काढले. तसेच बाजूला झोपलेले पती भागवत तुपे जागे झाल्याने त्यांच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करून डोके फोडले.

सरस्वती यांच्या पाकिटातील रोख दहा



हजार रुपये आणि गळ्यातील तसेच घरात ठेवलेले दोन तोळ्याचे दागिने घेऊन चोरटे पसार झाले.. या प्रकरणी शिरूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र या घटनेने परिसरात दहशत निर्माण झाली असून दरोडेखोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे..

बीडच्या शिरूर तालुक्यातील राक्षस भवन थांबा येथे शेतीच्या वादातून दोन गटात मोठा वाद झाला .या वादात महिला शेतकरी सीमा खोले यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला .या घटनेचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाल्यानंतर तीन जणांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे . सीमा खोले यांच्या पतीचे निधन झाले आहे. पतीच्या नावे असलेली शेतजमीन त्या वैती करतात.. मात्र याच जमिनी वरून भावकीतील दीपक खोले नानासाहेब तांबे आणि रामेश्वर अवसरमल यांच्यात वाद सुरू आहे. हा वाद विकोपाला गेल्यानंतर दोन्ही गटात हाणामारी झाली. आणि याच घटनेत महिलेच्या अंगावर ट्रॅक्टर घालून बेल्टने मारहाण झाली. या प्रकरणाचा अधिक तपास शिरूर पोलीस करत आहेत.

# महाराष्ट्रात २४ तासात अतिमुसळधार

पुणे (सरकार): राज्यभरात सध्या पावसाचा जोर वाढला आहे. भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या अंदाजानुसार पुढील २४ तासांकरिता रत्नागिरी, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. राज्यात मागील



२४ तासांमध्ये (१७ जून २०२५ राेजी सकाळपर्यंत) मुंबई उपनगर जिल्ह्यात ८३.४ मिमी पाऊस झाला आहे. तर ठाणे जिल्ह्यात ७३.७ मिमी, मुंबई शहर ६२.९ मिमी, रायगड ५४.१ मिमी आणि पालघर जिल्ह्यात ४९.७ मिमी सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.

राज्यात कालपासून आज १७ जून रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिमीमध्ये) : ठाणे - ७३.७, रायगड - ५४.१, रत्नागिरी - ४७.७, सिंधुदुर्ग - १२.७, पालघर - ४९.७, नाशिक - ७.७, धुळे - ७.१, नंदुरबार - ४, जळगाव - ६.७, अहिल्यानगर - १.१, पुणे - ११.९, सोलापूर - ०.९, सातारा - १९.७, सांगली - ६, कोल्हापूर - १७.८, छत्रपती संभाजीनगर - ०.६, जालना - ०.१, बीड - ०.७, लातूर - ०.१, धाराशिव - १.६, नांदेड - ३.६, परभणी - १.७, हिंगोली - ३.६, बुलढाणा - ३.५, अकोला - ८.७, वाशिम - ८.५, अमरावती - ९.४, यवतमाळ - ८.७, वर्धा - ७.६, नागपूर - ०.९, गोंदिया - ०.२, चंद्रपूर - ११.९, गडचिरोली - ५.२

# बदलीसाठी खोटे बोलल्यास शिक्षकांच्या अंगलट येणार!

मुंबई (सरकार): दिव्यांग किंवा गंभीर आजार असल्याची खोटी माहिती देत बदली टाळणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शिक्षकांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करून, त्यांना निलंबित करण्याचे निर्देश ग्रामविकास विभागाने काढले आहेत. जिल्ह्यांतर्गत बदली टाळण्यासाठी शिक्षकांकडून खोटी प्रमाणपत्रे सादर केली जात असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे बदली टाळण्यासाठी बनावट कागदपत्रांचा आधार घेतल्याचा संशय असलेल्यांची फेरतपासणी करण्याचे आदेशही ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्ह्यांतर्गत बदलीच्या धोरणानुसार 'विशेष संवर्ग शिक्षक भाग-१' मधील शिक्षकांना बदलीतून सूट दिली जाते. विविध आजारांनी ग्रस्त शिक्षक, दिव्यांग शिक्षक, दिव्यांग मुलांचे पालक, परित्यक्ता तसेच घटस्फोटित महिला शिक्षक, ५३ वर्षे पूर्ण झालेले शिक्षक, विधवा, कुमारिका शिक्षक, तसेच ज्या शिक्षकांचे जोडीदार गंभीर आजाराने ग्रस्त आहेत इत्यादींचा विशेष संवर्गात समावेश केला जातो. मात्र,




विविध आजारांची व दिव्यांगत्वाची खोटी प्रमाणपत्रे सादर करून बदलीमधून सूट मिळविणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच, न्यायालयानेही विशेष संवर्गाद्वारे बदलीपासून संरक्षण का दिले, याचा खुलासा करण्याचे आदेश काही खटल्यात केले आहेत. या पार्श्वभूमीवर हे आदेश देण्यात आले आहेत.

विशेष संवर्ग-१ मधील शिक्षकाच्या दिव्यांगत्वाबाबत किंवा आजाराबाबत काही साशंकता आढळल्यास, संबंधित शिक्षकाची जिल्हा शल्यचिकित्सकांकडून तपासणी करावी. दिव्यांग प्रमाणपत्र देताना मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन झालेले असावे. घटस्फोटित किंवा परित्यक्ता महिला शिक्षकांबाबत काही अनियमितता आढळल्यास घटस्फोट प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, स्वयंघोषणापत्र, रहिवास दाखले, आधार कार्ड, शिधापत्रिका इत्यादीवरून पडताळणी करावी. आवश्यकतेनुसार निवासी पत्त्यावर प्रत्यक्ष जाऊन शहानिशा करावी. स्वयंघोषणापत्रामध्ये काही अनियमितता केल्याचे आढळून आल्यास, अशा शिक्षकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. तसेच संबंधित शिक्षकाचे निलंबन करून शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी.

# बीड जिल्ह्यातील बारा प्रकल्प तुडुंब, शेती सिंचनाचा प्रश्न लागला मार्गी

बीड (सरकार): मे महिन्याच्या अखेरीस बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. यानंतर जून महिन्यातही जिल्ह्यात सर्वत्र चांगला पाऊस होत असल्याने प्रकल्पीय पाणीपातळी वाढत आहे. सध्या बीड जिल्ह्यातील दोन मध्यम व १० लघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले आहेत.



बीड जिल्ह्यातील शेतकरी, सर्वसामान्यांना दर दोन वर्षाला दुष्काळाचा सामना करावा लागतो. यावर्षी मात्र मे महिन्याच्या अखेरपासून जोरदार पाऊस कोसळत असून यामुळे शेतकरी, सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मे महिन्याच्या अखेरीस बीड जिल्ह्यात जोरदार पाऊस झाल्याने नदी-नाले ओसंडून वाहत होते.

यानंतर जूनच्या प्रारंभीही पावसाचा जोर कायम राहिल्याने आता जिल्ह्यातील बारा लघु आणि मध्यम प्रकल्प तुडुंब झाले आहेत. याबरोबरच मांजरा व माजलगाव या मोठ्या प्रकल्पांमध्ये देखील पाणीपातळी झपाट्याने वाढत आहे. पूर्ण क्षमतेने भरलेले मध्यम प्रकल्प बिंदुसरा व कडा प्रकल्प, पूर्ण क्षमतेने लघु प्रकल्प करचुंडी, जळगाव, मुंगेवाडी, धामणगाव, डोकेवाडा, लोकरवाडी, भायाळा, सिद्धवाडी, खटकळी, डोमरी.



# बिंदुसरा धरणावरील लोखंडी पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करा:आ.क्षीरसागर

बीड (सरकार) पुणे जिल्ह्यातील कुंडमळा धरणा-वरील लोखंडी पूल तुटून झालेल्या अपघातात चार जणांचा बुडून मृत्यू झाला तर २५ जन वाहून गेले होते, या घटनेचे गांभीर्य घेऊन बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांनी बिंदुसरा धरणावरील लोखंडी पुला बाबत संबंधित विभाग तसेच पोलिसांना खबरदारी घेण्याच्या सूचना केल्या असून या लोखंडी पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या त्यांनी सूचना केल्या.

याबरोबरच उ परिसरात सध्या पर्यटक मोठ्या प्रमाणावर भेट देत असून काही हौशी तर त्या पुलावर जावून उड्या मारत आहे. त्यामुळे पोलिसांनी हे क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र जाहीर करून त्या ठिकाणी बंदोबस्त द्यावा अशा सूचना केल्या.पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कुंडमळा धरणा-वरील लोखंडी पूल तुटून झालेल्या अपघात नंतर बीड जिल्ह्यात अशाच पद्धतीने कुठे कुठे अपघात होतील या भीतीने आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदार संघातील धरणे, तलाव या बाबतची आढावा बैठक घेऊन या बैठकीत ज्या ज्या ठिकाणी अशा पद्धतीचे जुने लोखंडी पूल आहेत त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांना दिल्या तसेच बीड ग्रामीण पोलिसांनादेखील त्यांच्या हद्दीतील धरणे, तलाव या ठिकाणी अशा धोकादायक पुलावर जाण्यापासून पर्यटकांना प्रतिबंध घालावा, त्याठिकाणी पोलिसांची ड्युटी लावावी अशा सूचना त्यांनी या बैठकीत केल्या.

दरम्यान पाटबंधारे विभागाने बिंदुसरा धरणावरील लोखंडी पूल हा निजामकालीन असून तो कमकुवत झाला असून त्याला खालून आधार दिला आहे. मात्र पर्यटकांनी त्याठिकाणी जर खूपच गर्दी केली तर निश्चित दुर्घटन होण्याची शक्यता असून त्या बाबत आपण जिल्हाधिकारी तसेच पोलिसांना पत्र व्यवहार केला असल्याचे बैठकीत सांगितले. निजामकालीन पूल असल्याने हा पूल तेवढा सक्षम राहिला नाही, त्यामुळे त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी प्रस्ताव दाखल करावा असे यावेळी अ.क्षीरसागर यांनी विभागाला सूचना केल्या.बीड येथील बिंदुसरा धरणावरील लोखंडी पूल हा निजामकालीन असून तो १९५१ सालचा आहे.

त्यामुळे तो आता ७४ वर्षाचा जुना पूल आहे. हा पूल मोठी गर्दी सहन करणारा नाही शिवाय या पुलाच्या खालून पाणी अत्यंत वेगाने प्रवाहित होत असल्याने धोक्याची शक्यता जास्त असून पर्यटकांनी या पुलावर जाऊ नये, असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

# संपादकीय

## पूल दुर्घटनेची पुनरावृत्ती नको...

अहमदाबाद येथील भीषण विमान अपघाताच्या स्मृती ताज्या असतानाच महाराष्ट्र आणि उत्तराखंड या राज्यांत दोन अपघात घडले. दोन्हींचे एकच कारण आहे ते म्हणजे, पर्यटकांचा अति उत्साह आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन न करता आपले वाहन संकटात टाकणे अन् मृत्यूला कवटाळणे. मावळमधील अपघात हा अशा प्रकारच्या पहिलाच अपघात नव्हे, तर त्या अगोदरही अशा प्रकारचे अपघात घडले आहेत. मावळमधील इंद्रायणी नदीच्या पुलावर कुंडमळा येथे अपघात घडला तो पूल खूप अरुंद आहे. तेथे वाहने घेऊन जाऊ नका, म्हणून वारंवार प्रशासनाकडून सूचना देण्यात येतात. पण पर्यटक ऐकत नाहीत आणि रविवारी दुपारी अपघात घडला तेव्हा त्या अरुंद पुलावर अनेक पर्यटक होते हे समजले आहे. हे पर्यटक पाणी पाहण्यासाठी जातात आणि वाहत्या पाण्यात कित्येक पर्यटक जीव गमावून बसले. कित्येक जण वाहून गेले, तर कित्येक बेपत्ता आहेत. आता त्यांची चौकशी होईल आणि नेमकी किती प्राणहानी झाली आहे तो आकडा समोर येईल. पण प्राथमिक आकडेवारीनुसार दहा ते पंधरा पर्यटक वाहून गेले असल्याची माहिती आहे.

राज्य सरकारने सर्व पुलांचे ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने सर्व पुलांची दुरुस्ती करण्याचे आदेश दिले आहेत. आता वारी पुढे आहे आणि लाखो वारकरी येणार आहेत. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना केल्या पाहिजेत. पण त्या अगोदरच या दुर्घटनेने प्रशासनाच्या डोळ्यांत चांगले अंजन घातले आहे. मावळ तालुक्यातील पर्यटकांचे आकर्षण म्हणून ओळख असलेला तळेगाव-दाभाडे येथील कुंडमळा हे ठिकाण प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. पण काल दुपारी निसर्ग शोभेची मौज पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला आहे. पूल पडल्यामुळे पर्यटक नदीच्या पाण्यात वाहून गेले आहेत. सुमारे सहा मृतदेह हाती लागले आहेत. म्हणजे घटना किती गंभीर आहे हे लक्षात येईल. हा पूल जीर्ण झाला असून मागील वर्षभरापूर्वी या पुलाच्या दुरुस्तीसाठी सहा कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता. पण त्याचे काम सुरू झाले नाही. या दिरंगाईला जबाबदार असणारेच या अपघाताला कारण आहेत हा निष्कर्ष काढता येतो. अपघात घडला तेव्हा १०० जण पुलावर उभे होते असेही समजले आहे. पण त्यांना कोणीही अटकाव केला नाही. रविवारी या अपघाताच्या जीवघेण्या कळा उठायच्या आधीच उत्तराखंडमध्ये आणखी एक भीषण अपघात घडला होता आणि त्यात सातही प्रवासी मृत्युमुखी पडले. आर्यन अव्हिएशनचे हेलिकॉप्टर ५.१७ वा. अवकाशात उड्डाण करण्यासाठी झेपावले आणि हवामानाच्या खराब अवस्थेमुळे आणि कमी दृष्यमानता असल्यामुळे कोसळले. सदरचा अपघात हा गुप्तकाशी येथे झाला आणि हेलिकॉप्टर केदारनाथ येथे चालले होते. हेलिकॉप्टर अवकाशात उडाले तेव्हा हवामान अजिबात चांगले नव्हते आणि तरीही वैमानिकाने तसेच हेलिकॉप्टर पुढे नेले. कमी दृष्यमानता आणि खराब हवामान ही कारणे देण्यात आली आहेत. कमी दृष्यमानतेमुळे अपघातांचा धोका वाढतो आणि त्यामुळे भारतीय हवाई दलाचे एमआय १७ चॉपर वारा आणि वजनामुळे आपले तोल गमावून बसले आणि कोसळले अशी प्राथमिक कारणे सांगतात. मावळमधील दुर्घटना असो किंवा हेलिकॉप्टर अपघात, प्रथम समोर येते ती प्रवासाची आवड... परिणामी कसलाही सारासार विचार न करता लोक प्रवासाला निघतात. ते हवामान कसे आहे आणि पाऊस असल्यामुळे हेलिकॉप्टर किंवा विमानाची दृष्यमानता आहे की नाही, हेही तपासण्याचे कष्ट घेत नाहीत. उत्तराखंड तर लांब आहे. पण इंद्रायणी नदीवरील पूल हा आपल्या महाराष्ट्रातील आहे आणि तेथे लोक आता पावसाळ्यात भरपूर प्रवास करतील आणि अशा अनेक अपघातांना सामोरे जातील. भुशी डॅम असो, लोणावळा किंवा अलिबागचा समुद्रकिनारा असो किंवा रत्नागिरीतील प्रसिद्ध पर्यटन स्थळे असोत, येथे अद्याप तितक्या सुविधा तयार झाल्या नाहीत. त्यामुळे प्रशासनाच्या हलक्या चुकीमुळेही प्रवाशांचा जीव जाऊ शकतो. तेच उत्तराखंडबद्दल सांगता येईल. तेथे खराब हवामान हा नेहमीचा इश्यू आहे. पण अशा हवामानात जाऊ नका असे सांगणारी कोणतीही यंत्रणा नाही. आता तेथे वैष्णोदेवीची यात्रा भरेल, तेव्हाही कित्येक लोकांचा जीव संकटात असेल. कारण तेथे तर रस्ते इतके अरुंद आहेत की फक्त खेचर चालत जाऊ शकते. लोकांच्या भक्तिभावाशी यात्रा जोडल्या गेल्याने त्यांना पुरेशा सुरक्षा पुरवणे आणि अपघात होऊ नयेत ही प्रशासनाची जबाबदारी आहे. केदारनाथवरून कित्येक हेलिकॉप्टर्सना अपघात घडले आहेत. भारतात अशा अपघातात किती लोक बळी गेले याची आकडेवारी पाहिली तर ती दहशतवाद्यांच्या हल्ल्यापेक्षा जास्त बळी गेले आहेत असे दिसते. त्यामुळे रस्ते अपघात किंवा पूल दुर्घटना किंवा हेलिकॉप्टर अपघात यामुळे झालेली प्राणहानी कोणत्याही कारणापेक्षा भीषण आहे. केवळ तात्पुरती नुकसानभरपाई देऊन हा प्रश्न सुटणार नाही. त्याची कारणे शोधून काढून चौकशी व्हावी आणि ज्या काही बॉटलनेक्स असतील त्या तातडीने काढून टाकल्या तरच असे अपघात घडणार नाहीत. मावळ असो किंवा उत्तराखंड असो, अपघात असो, जातात ते मानवी जीव जे प्रचंड किमती आहेत. त्यासाठी प्रशासनाने भविष्यात असे अपघात होऊ नयेत म्हणून तातडीने उपाययोजना हाती घेतली पाहिजे कारण हे जीव परत येणार नाहीत. यामुळे भारताचे नुकसान होते कारण कुणी कितीही लहान असला तरीही त्याच्या विकासासाठी देशाने आपली किमत मोजलेली असते. असे जीव जाणे म्हणजे देशाचे प्रचंड नुकसान आहे. हे होऊ नये यासाठी भविष्यात प्रत्येकानेच दक्ष राहिले पाहिजे.

# रिल्स स्वैराचाराला आमंत्रण देतायत का...?

**सोशल मीडियावर गल्लोगल्ली**
**नितीमूल्यांची झाली पायमल्ली**
**मांडला अब्रूचा हा बाजार सारा**
**प्रसिद्धीच्या हव्यासाचा**
**हा खेळ न्यारा...**

आजवर सोशल मीडियाकडे एकविसाव्या शतकातील सर्वांत महत्त्वाची क्रांती म्हणून पहिले जात होते. पण आज दुर्दैवाने सोशल मीडियाचा वापर केवळ भल्यासाठी होताना दिसत नाही ही क्रांती दुधारी आहे असे म्हणावे लागेल. त्याचा सुयोग वापर झाल्यास विधायक गोष्टी देखील सहज साध्य होऊ शकतात. गेल्या काही वर्षांमध्ये सोशल मीडियाचे दुष्परिणाम व उदाहरणे वाढत चालली आहेत. केवळ तंत्रज्ञानाच्या दृष्टीनेच नव्हे तर अगदी अबाल वृद्धांपासून सर्वसामान्यांच्या हातात अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य देणारं सुलभ माध्यम असल्याने त्याचं लोण झपाट्याने देशोदेशांमध्ये अगदी खेडोपाड्यांमध्येही पसरलं आहे.

***स्वैराचाराचे हे मोकळे रान***
***कित्येकांनी गमावला आपला प्राण***
***रिल्सची जडली फार वाईट नशा***
***अपंगत्वाने झाली कित्येकांची दुर्दशा...***

आज या आभासी जगात प्रसिद्धी व पैशाच्या हव्यासापोटी तरुणाईने आपली नितीमूल्ये, संस्कृती, परंपरा यांना पायदळी तुडवून सोशल मीडियावर आपले अंग प्रदर्शन मांडले आहे. चार वर्षांपूर्वी 'टिकटॉक'वर बंदी घातल्या नंतर निर्माण झालेल्या पोकळीचा फायदा घेण्यासाठी इन्स्टाग्रामने रील्स या संकल्पनेला जन्म दिला. आज या रिल्सनी तरुण पिढीवर अक्षरशः गारुड घातले आहे. अगदी घरातील लहान बाळाला जेवण भरविण्यापासून झोपेपर्यंत त्याच्या



सोबतीला मोबाइल असल्यामुळे त्यातच येत्या पिढीचे विश्व सामावलेले दिसून येते. सध्या अनेक पालक देखील टेलिव्हिजनवरील मालिकांना बळी पडल्यामुळे त्यांचे अनुकरण त्यांच्या कौटुंबिक जीवनात दिसून येते. शिवाय सध्याच्या धावपळीच्या युगात पालकांचे पाल्याकडील दुर्लक्ष, बाहेरगावी शिक्षणासाठी कुटुंबापासून लांब असलेले विद्यार्थी विद्यार्थिनी यांना कोणाचा धाक किंवा भय राहिले नसल्यामुळे हा सोशल मीडियावरील स्वैराचार दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. सध्या नवनवीन शैली (ट्रेंड)च्या नावाखाली अगदी सकाळच्या व्यायाम, योगापासून ते रात्री झोपेपर्यंत अनेक कृतींचे भडक चित्रीकरण असणाऱ्या रिल्स सोशल मीडियाच्या माध्यमातून पाहायला मिळतात. रिल्स पाहणे आणि रिल्स बनवणे हे एक प्रकारचे व्यसनच काळाच्या ओघात सर्वांना जडत आहे. त्याचा मानवी जीवनावर आरोग्यावर विपरीत परिणाम होताना देखील पाहायला मिळतो. माणगावच्या कुंभे येथील धबधब्याजवळ रिल्स बनवताना पाय घसरून ३०० फूट खोल दरीत पडल्याने एका तरुणीला आला जीव गमवावा लागला. अशा अनेक घटना आपल्याला सोशल मिडीयामार्फतच पाहायला मिळतात. केवळ प्रसिद्धीसाठी रिल्स बनवणे अनेकांच्या जीवावर बेतलेले आहे, तर अनेकांना शारीरिक तर काहींना मानसिक अपंगत्वास सामोरे जावे लागले आहे. हे जरी सत्य असले तरी त्याकडे दुर्लक्ष करून खास करून पर्यटनस्थळे, धबधबे, दरी, डोंगर रस्ते, रेल्वे, रेल्वे महामार्ग अशा ठिकाणी काहीतरी स्टंट करायचा किंवा हुल्लडबाजी करून प्रसिद्ध होण्याचे फॅड हल्ली वाढत चाललेले आहे. जन माणसांचा सोशल मीडियावरील मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद मित्र परिवाराचे समर्थन, पालकांचे दुर्लक्ष, कोरोना महामारीच्या काळापासून सुरू झालेला ऑनलाईन अभ्यासाच्या नावाखाली विद्यार्थ्यांचा मोबाइलचा वाढता वापर या गोष्टी स्वैराचाराला खतपाणी घालत आहेत. सोशल मीडिया व्यासपीठावरून मिळणारी प्रसिद्धी ही फार काळ टिकणारी नसते हे युवा वर्गाच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. २०१८ मध्ये प्रिया प्रकाश वारीयर या अभिनेत्रीचा ओरू अदार लव या चित्रपटातील एका २८ सेकंदाच्या रिल्सला जवळपास १ कोटींहून अधिक हिट्स प्राप्त झाले आणि ती प्रसिद्धीस आली. त्या पाठोपाठ २०१९ मध्ये रेल्वे स्टेशनवर भीक मागता मागता गाणे म्हणणारी राणू मंडल सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या तिच्या एका गाण्याच्या व्हीडिओमुळे रातोरात प्रसिद्धीच्या झोतात आली; परंतु आज सोशल मीडियावर त्यांचा बोलबाला अजिबात पाहायला मिळत नाही. जसं जितक्या लवकर या कलाकारांना प्रसिद्धी मिळाली तसंच तितक्याच लवकर ते जनमाणसांच्या विस्मरणात गेल्याचे आपल्यास दिसून येते. 'यशाला शोर्ट कट नसतो हेच खरं' सध्या मराठी बिग बॉस या मालिकेमुळे प्रसिद्धीस आलेला अतिशय गरीब कुटुंबातील रिल्सस्टार सुरज चव्हाण हे आत्ताचे ताजे उदाहरण आहे.

ग्रामीण व शहरी भागातील दरी... रिल्सच्या बाबतीत मिटली खरी...

आज घडीला अगदी खेड्यापाड्यांपासून सोशल मीडियावर व्यक्ती आणि विचार स्वातंत्र्याच्या स्वैराचाराने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा लोकांचा अधिकार असल्याने सोशल मीडिया कंपन्यांचे यावर म्हणावे तसे निर्बंध अद्याप नाहीत.

खरे पाहता सोशल मीडियाचे हे व्यासपीठ म्हणजे आरसा नसून आपण स्वतःवर रोखलेली एक अनधिकृत बंदूक आहे. ना त्यावर कोणाचे बंधन आहे, ना त्याला कोणता कायदा लागू आहे. ही डिजिटल व्यासपीठं केवळ तीन ते चार अमेरिकन खासगी कंपन्यांच्या मालकीची आहेत. या माध्यमातून या कंपन्या कोट्यवधी रुपये कमवत आहेत. सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या आपल्या भारत देशात सोशल मीडियासाठी मोठी बाजारपेठ आहे.

कारण भारत लोकसंख्येच्या बाबतीत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यामुळे सोशल मीडिया वापराचे भारतातील लोकांचे प्रमाण आज जगात सर्वाधिक आहे व उत्तरोत्तर ते वाढतच आहे. अशा वेळी जनमाणसांकडे स्वयंशिस्त अपेक्षित आहे. सोशल मीडियावर काय प्रदर्शित करावे, आलेले काय पाहावे, काय वाचावे, काय वाचू नये, कशावर विश्वास ठेवावा आणि कशावर ठेऊ नये, कोण आपल्या भावनांशी खेळ करीत आहे की कोण आपल्याला उत्तेजित करीत आहे हे ओळखण्यासाठी आता तिसरा डोळा हवा असे मला वाटतं.

# आयुर्वेद: धन्याचे पाणी पिण्याचे आरोग्यदायी फायदे

आयुर्वेदामध्ये धण्याचे पाणी पिण्याचे खूप फायदे सांगितले आहे. धणे हे युरिन इंफेक्शनच्या जळजळीस कमी करते. तसेच धणे शरीराला थंड ठेवण्यास मदत करतात. म्हणून धण्याचे पाणी शरीरातील अनेक समस्यांना कमी करण्यासाठी मदत करते. धण्याचे पाणी रोज पिल्यास खूप सारे फायदे मिळतात.

**धण्यामध्ये असतात न्यूट्रिएशन :** धणे मध्ये व्हिटॅमिन के आन ए असते. सोबत फायबर आणि अँटीऑक्सीडेंट्स देखील असतात. जे मेटाबॉलजीम आणि इम्युनिटी दोन्हीला इंप्रुव करण्यासाठी मदत करते. जर तुम्ही धणे रात्री एका ग्लासमध्ये भिजवून ठेवले आणि सकाळी पिट असाल तर कायम आरोग्यदायी राहाल.

**शरीराला करते डिटॉक्स :** धण्याचे पाणी रोज सकाळी पिल्यास शरीरामधील टॉक्सीस निघण्यासाठी मदत होते. त्वचेच्या समस्यांपासून आराम धण्याचे पाणी पिल्यास त्वचासंबंधित सर्व समस्या नष्ट होतात. धण्याचे पाणी नियमित सेवन केल्यास मुरूम, पुटकुळ्या या नष्ट होतात. आयुर्वेदानुसार धण्याचे पाणी पित्तनाशक आहे. तसेच जर शरीरामध्ये पित्त वाढल्यास त्वचा संबंधित समस्या निर्माण होतात.




**युरिन इन्फेक्शन नष्ट होते :** अनेकांना युरिन इन्फेक्शन होते, धण्याचे पाणी पिल्याने युरिन इन्फेक्शन पासून लवकर अराम मिळतो. तसेच शरीराला थंडावा येऊन गुप्तांगात जळजळ होत नाही.

**पाचन क्रिया सुधारते :** धण्याचे पाणी नियमित सेवन केल्यास पाचन क्रिया सुधारते. या पाण्यामध्ये मेटाबॉलजीम इंप्रूव होतात. ज्यामुळे पाचन चांगल्या प्रकारे होते. धण्याचे पाणी पिल्याने बद्धकोष्ठता होत नाही.

# योगा: मानसिकरीत्या आहात चिंतीत तर हृदयावर पडेल दबाव

आपले मन आणि मस्तिष्क यांच्या शरीरावर जास्त प्रभाव पडतो. जर तुमचे मन आणि मेंदू आरोग्यदायी असले तर तुमचे शरीर देखील आरोग्यदायी राहते. जर तुम्ही चिंतीत असाल तर याच्या प्रभावा थेट तुमच्या हृदयावर पडतो. ज्यमुळे तुमच्या मेंदूपर्यंत ऑक्सिजन पुरवठा कमी होतोत. तसेच श्वासांमध्ये देखील फरक जाणवतो. व ऑक्सिजनचे प्रमाण कमी व्हायला लागते. जर नियमितपणे प्राणायामाचा अभ्यास केला तर श्वासाची गती सुधारते. आणि मेंदूमध्ये ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. ज्यामुळे मेंदू आणि मन ताजे राहते.



**पादासन–** पादासन हे आसन केल्याने मानसिक तणावापासून आराम मिळतो. करण्यासाठी तुम्ही आपले डाव्या पायाचे गुडघे वाकवून उजव्या पायाच्या मांडीवर ठेवावे. व दोन्ही हातांना वर नेऊन प्रणाम मुद्रांमध्ये यावे. काही वेळ याच अवस्थेमध्ये राहिल्यानंतर सामान्य अवस्थेमध्ये परत यावे.

**ध्यान–** प्रत्येक दिवशी ५ ते १० मिनिटाचे ध्यान करावे यामुळे मेंदू आणि शांत राहतो तसेच रोगप्रतिकात्मक शक्ती वाढते. ध्यान तुमच्या रक्तचापाला नियंत्रित ठेवते.तसेच शरीर रोग्यादायी बनते. तसेच रोज नियमित ध्यान केल्याने तुमचे हृदय आरोग्यदायी राहते.

# गरोदरपणात लिची फ्रुट्सचे फायदे!

गरोदरपणात महिला अनेकदा आहाराबाबत गोंधळून जातात. जर आपण उन्हाळ्याबद्दल बोललो तर या हंगामात गर्भधारणेदरम्यान, आपण अशा फळांचे सेवन केले पाहिजे जे आपल्या शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढतात. एक उन्हाळी फळ आहे जे रसाळ असण्यासोबतच अनेकांचे आवडते फळ आहे. लिची असे या फळाचे नाव आहे. गरोदरपणात लिचीचे सेवन करणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. लिचीमध्ये कार्बोहायड्रेट, फायबर, व्हिटॅमिन सी, फोलेट, कोलीन, फॉस्फरस आणि पोटॅशियम भरपूर असते, जे मेंदू, यकृत आणि हृदयासाठी खूप चांगले फळ मानले जाते. यासोबतच रक्तदाब संतुलित ठेवण्यासही मदत होते. तथापि, त्याच्या पोषक तत्वांचा जास्तीत जास्त फायदा मिळविण्यासाठी मर्यादित प्रमाणात त्याचे सेवन करणे महत्वाचे आहे. लिची जास्त प्रमाणात खाल्ल्यास शरीरात सूज येऊ शकते. याशिवाय त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त आहे. अशा स्थितीत शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढू शकते.



## गरोदरपणात लिची खाण्याचे फायदे

गरोदरपणात लिची खाणे केवळ गरोदर महिलांसाठीच फायदेशीर नाही, तर त्याचा गर्भालाही फायदा होऊ शकतो.याच्या मदतीने मेंदूचा विकास सुधारता येतो. ते यकृतासाठी निरोगी असू शकते. शरीराला ऊर्जा देण्यासाठी उन्हाळ्यात लिची खाऊ शकता. याच्या सेवनाने रक्तदाब नियंत्रित ठेवता येतो.

# दही पनीर पराठा

डिनर मध्ये रोज एकसारखे तेच ते जेवण जेऊन प्रत्येकालाच कंटाळा येतो. चला तर मग आज काही नवीन ट्राय करू या. पराठा हा असा एक पदार्थ आहे जो सर्वांना आवडतो. गरम गरम पराठे सर्वचजण आवडीने खातात. तर चला आज आपण बनवूया दही पनीर पराठा, जो चविष्ट तर आहेच पण त्यासोबत हेल्दी देखील आहे. तर चला लिहून घ्या रेसिपी

**साहित्य :** १०० ग्राम पनीर, १ कप दही, १ कप तिखट, १ कप हिरवी कोथिंबीर, गव्हाचे पीठ, चवीनुसार मीठ, २ चमचे तेल, ओवा,जिरे पूड, बारीक चिरलेली पत्ता कोबी, बारीक चिरलेला कांदा, बारीक चिरलेली सिमला मिर्ची



**कृती :** सर्वात आधी एका परातीमध्ये गव्हाचे पीठ घ्या. व त्यामध्ये मीठ, ओवा, तेल टाकून छान मऊ मळून घ्या. व त्यावर झाकण ठेऊन द्यावे. एका बाऊलमध्ये पाणी नसलेले दही घ्यावे. त्यामध्ये पनीर घालावे. सोबत पत्ता कोबी व सिमला मिर्ची आणि कांदा घालावा. तसेच या मिश्रणामध्ये बारीक चिरलेली कोथिंबीर घालावी. व तिखट, जिरे पूड, मीठ घालावे. आता हे मिश्रण चांगल्या प्रकारे मिक्स करावे. आता हे मिश्रण लाटलेल्या पोळीवर पसरवून पोळीच्या काठांना पाणी लावून तिची घडी घालावी. व परत लाटावी. यानंतर हा पराठा तव्यावर टाकून शेकून घ्यावा. तर चला तयार आहे दही पनीर पराठा.

# सुक्या मेव्याने केस काळे, दाट आणि चमकदार बनवा

किचनमध्ये सहज मिळणाऱ्या ड्रायफ्रूटचा वापर नैसर्गिक केसांना कलरिंग एजंट म्हणूनही करता येतो. हे ड्राय फ्रूट अंजीर आहे, ज्याची चव सर्वांनाच आवडते. पोषक तत्वांनी युक्त अंजीर वापरून केस रंगवण्याची पद्धत जाणून घेऊया.५-६ वाळलेल्या अंजीराचे तुकडे घ्या आणि रात्रभर पाण्यात भिजवा. त्याचप्रमाणे २ चमचे मेथीचे दाणे किंवा सुक्या मेथीचे दाणे घ्या आणि ते देखील भिजवा.दुसऱ्या दिवशी सकाळी मेथी आणि अंजीर दोन्ही गाळून पाण्यापासून वेगळे करा.मेथी आणि अंजीर अलगद मिक्सरमध्ये बारीक करून घ्या.आता दोन्ही गोष्टी एकत्र करा. त्यात २ चमचे बेसन घालावे.या मिश्रणात २-३ चमचे दही आणि एक चमचा एलोवेरा जेल घाला. या मिश्रणात थोडे पाणी घाला.आता मिक्सर चालवून एकदा सर्व गोष्टी मिक्स करा.आता ही पेस्ट एका भांड्यात घाला आणि केसांना लावा.तासाभरानंतर केस शॅम्पू आणि पाण्याने स्वच्छ करा.

# कधी न कळलेला 'बाबा'

आयुष्यातल्या छोट्या-मोठ्या क्षणांचा आनंद साजरा करण्यासाठी आपण अनेक नवनवीन डेज साजरे करतो, मग तो मर्दस डे असो. वा फार्दस डे असो. आनंद साजरा करायला फक्त काही निमित्त असणे गरजेचे असते.

आता नुकताच होऊन गेलेला मर्दस डे आपल्या सर्वांच्या आईच्या चेहऱ्यावर काही सुखद अनुभवाचे क्षण नक्की देऊन गेला असेल. कारण आई आणि तिच्या मुलाचं नातं हे अतिशय गोड असतं. आई खूप हळवी, मायाळू असते. तिच्याशी असलेली लाघवी एका सुंदर नात्याचे दर्शन घडविते. पण बाबा..., बाबा म्हटलं की डोक्यावर आठ्या, मनात थोडीशी भीती, आपण चुकलो तर ओरडा हा नक्कीच मिळेल अशी असलेली धाकधूक एका सोज्वळ माणसाच्या निर्मळ स्वभावावर जणू पर्दा टाकते आणि बाबांचं प्रेम हे कायमच अनुत्तरित राहते. पण खरंच वडील हे असेच असतात का? हा



प्रश्न कायमच मनाला भेडसावतो. पण म्हणतात ना काही कोडी जितकी अवघड दिसतात तेवढी ती नसतात. मात्र सभोवताली असलेली परिस्थिती तसे चित्र उभे करते.

कधी कधी आजारावर मात करण्यासाठी कडू औषधाशिवाय पर्याय नसतो. कारण औषध जितके कडू तितकंच ते एखादा आजार सहज बरा करण्यासाठी उपयुक्त ठरते. तसेच काहीसे आपले वडील. जे कायमच शिस्त, अनुशासन, चांगल्या विचारांचे, वागणुकीचे पाढे लहानपणापासून गिरवायला शिकवतात. त्यांच्या या सक्त स्वभावामुळे व कटू बोलण्यामुळे हे सगळं करण्यामागचा नि:स्वार्थ हेतू मात्र दिसेनासा होतो. अनेकदा आपल्या तोंडून लहान-मोठ्या जखमा किंवा वेदनांवेळी आई, आई गं... असे सहज निघून जाते, मात्र डोळ्यांसमोर एखादं मोठं संकट उभं राहतं तेव्हा बाप रे... ही हाक अंतर्मनातून कळवळून येते कारण त्या मनालाही खात्री असते माझा बाप मला या संकटातून नक्कीच मुक्त करेल. असं म्हणतात, आपल्या वडिलांची चप्पल जेव्हा त्यांच्या मुलाला अगदी व्यवस्थित बसते तेव्हा मुलगा जबाबदारीने वागण्यासाठी परिपूर्ण होतो. मात्र त्या चप्पलांमध्ये बसणारे हे पाय कधी कुठे धडपडू नयेत, कोणती वाईट वाट धरू नये यासाठी अफाट कष्ट करणारा बाबा आपल्या मुलांसाठी सदैव तत्पर असतो. इतक्यावरच नाही हा संपत त्यांचं प्रेम. आपल्या गरजा, स्वप्न, इच्छा सगळं काही विसरून माझी पाखरं उंच भरारी घ्यावीत यासाठी कायम तो तडजोड करतो. बाबा मला आज हे हवं म्हटल्याचं क्षणी ते कसे देता येईल म्हणून स्वतःसाठी कधी बाजूला काढून ठेवलेले पैसेही तो त्याच्या लेकरांसाठी वापरतो. लहानपणी चालणं जरी आईने शिकवले असले तरी त्या वाटेवर चालताना येणारे अडथळे बाबाच दूर करतो. तो कधीच आपल्या मुलांचे तोंडभरून कौतुक करणार नाही. पण आपली लेकरं हळूहळू यशाची वाटचाल करतायेत हे समजल्यावर देवासमोर उभा राहून हात मात्र जोडतो. तसेच जबाबदारीचे ओझे खांद्यावर कितीही असले तरी त्याच खांद्यावर बसून फिरवताना हे जग सुंदर आहे मात्र दिसतं तेवढं सामान्य नाही म्हणून दुनियादारीचे धडे शिकवतो. बाप हे आयुष्याच्या चित्रपटातलं एक असं पात्र आहे जो संपूर्ण आयुष्याचा चित्रपट घडवतो. पण प्रेक्षकांच्या भूमिकेत राहून माझा काहीच रोल नाही असं म्हणत फक्त आपल्या मुलांचा चित्रपट हिट झाल्यावर येणारे आनंद अश्रू लपवतो. खरंच वडील ही एक अशी व्यक्ती आहे जी सहजासहजी समजणं कठीण आहे. पण त्या व्यक्तीमुळे येणारा प्रत्येक दिवस हा आनंदी आहे. तसेच अगदी मनापासून बोलावेसे वाटते, भय नाही या मनास, कारण माझ्यामागे माझा खंबीर 'बाबा' उभा आहे.

# विशेष वृत्त

## भावजयीसमोर अश्लिल चाळे; गुन्हा दाखल

**केजः** केज तालुक्यात ८० वर्षीय वृद्धाने ७० वर्षाच्या भावजयीसमोर अश्लिल चाळे केल्याची घटना घडली आहे. केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक ७० वर्षीय वृद्ध महिला म्हैस चारीत असताना तिचा ८० वर्ष वयाचा दीर तेथे आला. त्याने तिच्याशी म्हैस चारण्याच्या कारणावरून भांडण करून शिविगाळ केली. तसेच वृद्ध भावजईला त्याने अश्लिल चाळे करून तिचा विनयभंग केला. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारी वरून ८० वर्षाच्या दिराविरुद्ध युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. १५१/२०२५ भा. न्या. सं.७४, ७५, ७९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस कांगणे या पुढील तपास करीत आहेत.

## धनगरवाडी येथील जि.प.शाळेत विद्यार्थी प्रवेशोत्सव

**शिरूर :** तालुक्यातील धनगरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी शाळेत नव्याने प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. सकाळी विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढून वातावरण निर्मिती करण्यात आली. या कार्यक्रमाला सरपंच ललिता साईनाथ कैतके यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायण रानमारे शिक्षणप्रेमी सदस्य काशिनाथ रानमारे, मुख्याध्यापक रामेश्वर शेळके, महादेव शिरसाठ, सुभाष सांगळे, विजूताई मिसाळ, अनंत सानप, मधुकर जायभाये ग्रामविकास अधिकारी प्रविण मिसाळ यांची उपस्थिती होती. शासनाच्या या उपक्रमाचे आयोजन शाळेचे शिक्षक वैभव झिरपे यांनी केले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थांची देखील मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पीक प्रात्यक्षिकांची आता ऑफलाईन निवड होणार

**बीड :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान-अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिके, राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया व 'आरकेव्हीवाय' अंतर्गत महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य (श्रीअन्न) अभियानासाठी शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेनुसार विविध पिकांचे प्रात्यक्षिके गट लाभार्थ्यांमार्फत घेतली जाणार आहेत. 'महाडीबीटी' पोर्टलवर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे उर्वरित पीक प्रात्यक्षिकांसाठी आता ऑफलाइन निवड प्रक्रिया राबवली जाणार आहे. कृषी विभागाने प्राथमिक टप्प्यात महाडीबीटी पोर्टलवर 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वावर अर्ज मागविले होते. या प्रक्रियेत आतापर्यंत ८३४ गट लाभार्थ्यांची निवड यशस्वीरीत्या करण्यात आली असून, निवड झालेल्या गटांची यादी संबंधित विभागांना पाठवण्यात आली आहे. मात्र महाडीबीटी पोर्टलवर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे उर्वरित पीक प्रात्यक्षिकांसाठी आता ऑफलाइन निवड प्रक्रिया राबवली जाणार आहे. या निवड प्रक्रियेत 'एक गाव, एक गट, एक प्रात्यक्षिक' हे तत्त्व पाळले जाणार असून, अर्ज अधिक असलेल्या गावांमध्ये निवड प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत.

## सिंदफणा नदीत अवैधरित्या वाळू उपसा; ट्रॅक्टर पकडले

**बीड -** चकलंबा ठाणे हद्दीतील मौजे धारवंटा शिवारात सिंदफना नदीत अवैधरित्या वाळू उपसा करणारे ट्रॅक्टर पोलिसांनी ताब्यात घेतले. १५ जून रोजी ही कारवाई करण्यात आली. सुरुवातीला पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता ट्रॅक्टरमध्ये वाळू भरणाऱ्या लोकांनी वाळू नदीमध्ये टाकून ट्रॅक्टर पळवून नेले मात्र यावेळी पोलीस पथकाने त्यांचा पाठलाग करुन गावात ट्रॅक्टरचा शोध घेतला असता ट्रॅक्टर (क्र. एम.एच. बी.एच. २०३१) ताब्यात घेतले. याप्रकरणी ट्रॅक्टर चालक व मालक यांच्याविरुध्द चकलंबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या कारवाईत एकूण ७ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चकलांबा ठाण्याचे सपोनि संदीप पाटील, उपनिरीक्षक अजय पान पाटील, अंमलदार मिसाळ, पोलीस अंमलदार, खटाने, अंमलदार घोगडे यांनी ही कारवाई केली.

# विठ्ठल गडावर उगवली विकासाची पहाट

## कोट्यावधी रुपयांतून साकारल्या योजना, अध्यात्मासह शिक्षणावर भर

**बीड (प्रतिनिधी):** गेवराई तालुक्यातील मादळमोही गावाजवळून हाकेच्या अंतरावर असलेल्या डोंगर कुशीत वसलेलं अनेक शतकांचं विठ्ठल गड देवस्थान आहे. डोंगर पठारावर वसलेलं श्री विठ्ठल देवस्थान अध्यात्माचं अधिष्ठान आहे. मात्र गेल्या काही वर्षात येथे भाविकांना सोयी उपलब्ध नसल्याने अडचणी यायच्या. याच गोष्टींची दखल घेत श्री क्षेत्र नारायण गडचे महंत शिवाजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व श्रीक्षेत्र नारायण गडचे उत्तराधिकारी संभाजी महाराज यांच्या पुढाकारातून या विठ्ठल गडावर आता विकासाची पहाट उगवली आहे. महंत शिवाजी महाराज आपल्या कीर्तनातून वारंवार सांगतात शेतीविका परंतु आपल्या मुलांना शिका, त्याच युक्तीची जाण ठेवत श्री विठ्ठल गडावरून आता अध्यात्मा बरोबर शिक्षणाची ही मुहूर्तमेंत रोवल्या जात आहे. गडावर वृक्षारोपणातून निसर्ग सौंदर्य मोठया प्रमाणात खुले असून भक्तनिवास दक्षिण मारुती मंदिर विद्यार्थ्यांसाठी राहण्या साठी होस्टेल अभ्यासिका व सुसज्ज असे रस्ते पिण्याच्या पाण्याची सोय आधी सोयी



विठ्ठल गडावर आता साकारत आहेत. यामुळे विठ्ठल गडावर विकासाची पहाट उगवल्याची भावना भाविकातून व्यक्त होत आहे.

मादळमोही पासून काही अंतरावर डोंगरावर असलेल्या श्री विठ्ठल मंदिर हे मादळमोही सह परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान व अध्यात्मिक ऊर्जा केंद्र आहे. गेल्या अनेक शतकापासून मादळमोही सह परिसरातील भाविक या विठ्ठल गडावर पूजापाठसह वारकरी संप्रदायाची पताका रोवून आहेत. या गडावरून हरिनामाचा जागर सतत होत असतो. असा महत्त्वाचा गड असला तरी गेल्या काही वर्षापासून गडावर भाविकांसाठी पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने हा गड काहीसा अडगळीला पडल्यासारखा होता. एकीकडे श्रीक्षेत्र नारायण गड, मादळमोही येथील जगगुरु संत तुकाराम महाराज मंदिर असे संस्थान भव्य स्वरूप घेत असताना या गडावरही भाविकांसाठी विकास कामे व्हायला पाहिजे अशी भूमिका महंत शिवाजी महाराज यांनी व्यक्त केली होती. श्री क्षेत्र नारायण गड असो, पंढरपूर असो, आळंदी असो, पैठण असो किंवा मादळमोही अशा ठिकाणी भाविकांसाठी सोयी सुविधा निर्माण व्हाव्यात व येथून अध्यात्माबरोबर समाज सन्मार्गाला लावणे व मुलांचे शिक्षण यास महंत शिवाजी महाराज यांनी प्राधान्य देत त्या दृष्टीने गेल्या वीस वर्षात वाटचाल सुरू केली आहे. याच पावलावर पाऊल ठेवत महंत संभाजी महाराज यांनी श्री विठ्ठल गडाचा विकासाचा ध्यास घेतल्याने आज गडाचे रूपडे पालटल्याचे दिसून येत आहे. मादळमोही येथील ज्येष्ठ नागरिक आसाराम अण्णा तळेकर म्हणाले की, विठ्ठल गड येथे सोनाबाई व शांताबाई या महिला भाविक वारकरी भक्तांनी विठ्ठल गडाची सेवा केली, या सेवेचे आज वटवृक्षात रूपांतर झाल्याचे दिसून येत असल्याचेही तळेकर म्हणाले. आज घडीला विठ्ठल गड येथे साडेसात कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. यामध्ये भव्य असे भक्तनिवास, दक्षीणमुखी मारुती मंदिर, विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, वाचनालय, भव्य हॉल, पिण्याचे पाण्याची सोय आदीसोयी उपलब्ध केल्या आहेत. विठ्ठल गड परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केल्याने गडाने हिरवाईची कास धरली आहे.

## माळापुरीत शेतकऱ्यांना शास्त्रीय बीजोत्पादन बियाण्यांचे वर्गीकरण व बीज प्रमाणपत्राबद्दल कृषीदुतांकडून मार्गदर्शन

**बीड (प्रतिनिधी):-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. के. एस. के. काकू कृषी महाविद्यालय बीड येथील कृषीदुतांनी मौजे माळापुरी येथे बियाणांच्या विविध वर्गीकरण आणि प्रमाणपत्राचे महत्त्व यावर प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश स्थानिक शेतकऱ्यांमध्ये बियाणांच्या गुणवत्तेबद्दल जागरूकता वाढवणे होता.

या सत्रात बियाणांच्या विविध वर्गीकरणांची माहिती देण्यात आली, ज्यात मूलभूत /पैदासकाराचे, पायाभूत, प्रमाणित, नोंदणीकृत सत्यवर्धक बियाणांचा समावेश होता. या वर्गीकरणांचा उपयोग उच्च उत्पादन क्षमता, बिजोत्पादन तंत्रज्ञान आणि रोग प्रतिकारशक्ती सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. तसेच, बियाणांच्या रंगीत टॅग्सच्या माध्यमातून त्यांचे वर्गीकरण ओळखता येते. 'ब्रिडर' बियाणांसाठी सोनेरी पिवळा, 'फाऊंडेशन' साठी पांढरा, 'रजिस्टर्ड' साठी



जांभळा, 'सर्टिफाइड' साठी निळा आणि टुथफूलसाठी हिरवा टॅग वापरला जातो. या टॅग्समुळे बियाणांची शुद्धता आणि ओळख पटविणे सोपे होते. या कार्यक्रमाला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला चांगला

प्रतिसाद दिला. तसेच गावातील सदन शेतकरी व प्रतिष्ठित नागरिकांचेही शेती विषयक अनुभव प्राप्त झाले. कार्यक्रमत यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कृषी दुतांना महाविद्यालयाचे सहसचिव डॉ.जी. व्ही. साळुंखे, प्राचार्य डॉ.एस.पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक, डॉ. एस.टी. शिंदे व उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.जी.पी. राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी कृषीदूत शिवराज पाटील, आदित्य बाडमारे, सुमित वांढरे, शुभम तकिक, ऋतुराज देशमुख, अमर पवळ, उके वामसी उपस्थित होते.


## मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते अभिनेता डॉ. महेश कुमारचा सत्कार

**बीड (प्रतिनिधी):-** महिला सशक्तीकरणावर आधारित वामाः लढाई सन्मानाची या सुपरहिट चित्रपटातील प्रमुख भूमिकेसाठी अभिनेते डॉ. महेश कुमार वनवे यांचा इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास आणि अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांनी १५ जून २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

या भेटीदरम्यान, मंत्री सावे यांनी वामा चित्रपटाच्या

यशाबद्दल अभिनंदन व्यक्त करत डॉ. महेश कुमार यांच्या पुढील प्रकल्पासाठी शुभेच्छा दिल्या. विशेषतः, शेतकऱ्यांच्या आयुष्यावर आधारित त्यांच्या आगामी चित्रपटाबाबत त्यांनी उत्सुकता व्यक्त केली. याआधीही, सुमारे अडीच वर्षांपूर्वी बीडचे पालकमंत्री असताना, पीएचडी मिळाल्याबद्दल डॉ. महेश कुमार यांचा बीड येथे सत्कार करण्यात आला होता. या कार्यक्रमास रत्नदीप टॉकीजचे संचालक विनोद अग्रवाल हेही उपस्थित होते.

## बीडमधील विद्यार्थ्यांनी बनवली हायब्रीड कार !





**बीड (प्रतिनिधी):** येथील म.शि.प्र.म संचलित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतनमध्ये मॅकॅनिकल शाखेत तृतीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दोन शक्तीवर चालणारी हायब्रीड कार बनवली आहे. त्यात ड्युअल मोड असून एकामध्ये ही कार बॅटरीवर चालते व एक मोडमध्ये ही कार इंजिनवर चालते. यासाठी विद्यार्थ्यांनी १६० सी.सी क्षमतेचे दुचाकीचे इंजिन वापरले आहे. कमीत कमी खर्चामध्ये ही कार ताशी ५० किलोमीटर वेगाने चालू शकते. एका वेळेस या कारमधून ५ जण प्रवास करू शकतात. ही कार भविष्यात सोलर पॅनलवर पण चार्ज करण्यासाठी यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन महाविद्यालयाचा उपक्रम उपयोजना करणार असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.मॅकॅनिकल शाखेतील तृतीय वर्षातील विद्यार्थी शेख रहमत, शेख सोहेल, शेख अहमद व पठाण रेहान यांनी ही कार बनवली आहे. हा प्रोजेक्ट करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव मरलापल्ले यांचे मुख्य मार्गदर्शन लाभले. ते म्हणाले, आम्ही विद्यार्थ्यांना थिअरी सोबत प्रॅक्टिकल ज्ञान पण जास्तीत जास्त देतो. हा प्रोजेक्ट यशस्वी झाल्याबद्दल विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, उपाध्यक्ष अमरसिंह पंडित, सचिव सतीश चव्हाण, प्राचार्य. डॉ. बापूराव मरलापल्ले, मॅकॅनिकल शाखेचे विभागप्रमुख एफ. जे. शेख, महाविद्यालयाचे सर्व शाखांचे विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# अंथरवण पिंप्री आश्रम शाळेत प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न



**बीड (प्रतिनिधी):-** श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड संचलित प्राथमिक माध्यमिक आश्रम शाळेत प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

सर्वप्रथम नवीन मुलांचे शाळेच्या पहिल्याच दिवशी गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या शुभहस्ते पुस्तक वाटप करण्यात आले. पुढील वर्गात प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांना ही पुस्तकांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मान्यवर म्हणून संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, इतर मागास बहुजन कल्याण विभाग कार्यालयाचे निरीक्षक बारगजे, संस्थेचे सचिव अतुलभाऊ पवार अंथरवन पिंपरी तांड्याच्या सरपंच सौ.अनितातांई दिनेशराव पवार, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण कार्यालय बीड शिष्यवृत्ती विभागाचे प्रमुख प्रसाद शुक्ला, प्राचार्य खंदारे सर, मुख्याध्यापक शिंदे सर पर्यवेक्षक जवरे सर हे उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे निरीक्षक बारगजे यांनी नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करावा व शिक्षकांनी प्रामाणिकपणे ज्ञानदान करावे ही अपेक्षा व्यक्त केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार म्हणाले की, अभ्यासात सातत्य असेल तर प्रत्येक विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो म्हणून अभ्यासात नियमित सातत्य हेच यशाचे रहस्य आहे असेही ते म्हणाले. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांचे मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले. कृतीयुक्त गीतातून नवीन विद्यार्थ्यांचा परिचय घेण्यात आला. यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे व्ही.एन.यांनी तर आभार प्रदर्शन पवार सर यांनी केले.

# आता बदलणार पावसाचे रूप; पंजाबराव डख यांचा हवामानाचा अचूक अंदाज

**पुणे (प्रतिनिधी):-** गेल्या काही दिवसापासून मान्सून रखडल्याच्या आपण बातम्या ऐकल्या किंवा बाचल्या असतील व मे महिन्यापासून पूर्व मोसमी पावसाने राज्यात जोरदार हजेरी लावली व सगळीकडे जोरदार स्वरूपाचा पाऊस झाला आणि त्यानंतर मात्र मान्सूनचे आगमन देखील वेळेआधी झाले व त्यामुळे देखील राज्यामध्ये पावसाने मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली. त्यानंतरच्या कालावधीत मात्र मान्सून रखडला आणि मान्सूनची प्रगती किवा मान्सूनचा वेग हवा तितका यह शकला नाही व त्यामुळे राज्यांमध्ये पावसाने उघडीप दिली होती.

या सगळया कारणामुळे शेतकरीवर्गामध्ये मात्र पेरणीच्या संदर्भात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु आता जर आपण हवामान खात्याचा अंदाज बघितला तर मान्सून परत एकदा सक्रिय झाला असून राज्यातील विविध भागांमध्ये आता पावसाने हजेरी लावायला सुरुवात केली आहे त्यामुळे नक्कीच शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे बातावरण असून पेरणीच्या कामाला सुरुवात होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्या राज्याच्या विविध भागात जोरदार स्वरूपाचा पाऊस होत असून हवामान विभागाचा अंदाज जर बघितला तर त्यांच्यानुसार १८ ते २० जून पर्यंत राज्यात जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. या सगळ्या पाश्र्वभूमीवर प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी आज १५ जून रोजी ताजा हवामान अंदाज वर्तवला व त्यानुसार पाऊस कसा राहील व शेतकऱ्यांनी या कालावधीत काय काळजी घ्यावी? याबाबतचे अनमोल मार्गदर्शन केले. प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी १५ जून २०२५ रोजी हवामान अंदाज वर्तवताना म्हटले की, राज्यामध्ये १५ ते १८ जून या कालावधीमध्ये विविध भागांमध्ये पावसाच्या जोरदार सरी कोसळणार असून सरींवर सरी या पद्धतीचा पाऊस पडणार असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच शेतकऱ्यांच्या बाबतीत त्यांनी म्हटले की, सध्या जमिनीमध्ये चांगली ओल असल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. जमिनीमध्ये जर एक फूट ओल असेल तर पेरणीची तयारी करण्याचा अनमोल सल्ला त्यांनी शेतकऱ्यांना दिला. तसेच पावसाच्या बाबतीत म्हटले तर राज्यामध्ये दररोज वेगवेगळ्या भागात पाऊस हा सुरूच राहणार आहे व इतकेच नाहीतर हा पाऊस सर्व ठिकाणी एकसारखा पडणार नाही. परंतु भाग बदलत बदलत पडणार असून राज्यात पाऊस हा सुरूच राहणार असल्याचे देखील त्यांनी नमूद केले, पूर्व तसेच पश्चिम विदर्भ, दक्षिण व उत्तर महाराष्ट्र, कोकणपट्टी, खानदेश आणि मराठवाडा या सगळ्या भागांमध्ये दररोज पाऊस पडणार असल्याचे त्यांनी सांगितले, एकदम पाऊस उघडीष देईल अशी स्थिती नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. अशा पावसामुळे शेतकरी जे काही पेरणीकरतील ते व्यवस्थित प्रकारे उगवेल असे देखील त्यांनी म्हटले. शेतकऱ्यांसाठी त्यांनी आवाहन केले की, या पावसामध्ये चिजांचे प्रमाण जास्त राहणार असल्यामुळे बिजांचा कडकडाट होत असताना झाडांखाली विशेष आंबा आणि लिंबाच्या झाडाखाली थांबू नये असे त्यांनी म्हटले, तसेब नारळाची उंच झाडे असतील तर त्या ठिकाणी देखील आसरा घेऊ नये. पाण्याची टाकी किंवा मोबाईल टॉवर, लोखंडी पोल इत्यादी ठिकाणी अशा परिस्थितीत थांबू नये असे आवाहन त्यांनी नागरिकांना आणि शेतकऱ्यांना केले. अशा ठिकाणी जास्त प्रमाणात विज कोसळते असे देखील त्यांनी नमूद केले.

# चला शाळेच्या सुट्या संपल्या ;गावोगावी शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत

## १०० शाळात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने प्रवेशोत्सव सोहळा;वांगीला पोहोचले बीडचे तहसीलदार शेळके

बीड (सरकार): तालुक्यातील वांगी येथे सोमवार दि १६ जून रोजी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात जि. प. कें. प्रा. शाळा , वांगी येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आली . या प्रसंगी विदयार्थ्यांना पुष्पगुच्छ , पुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशाने आज जिल्हाभरात विविध विभागाचे अधिकारी सकाळीच विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी पोहोचले . विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी , पहिल्या दिवसापासूनच हजेरी वाढावी आणि एकंदरीतच शैक्षणिक वातावरण निर्मिती व्हावी हा या मागचा उद्देश आहे . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व स्वतः जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन विविध शाळांमध्ये उपस्थित होते .

वांगी येथे शाळेत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी १०० टक्के विद्यार्थ्यांची पटनोंदणी व्हावी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या इयत्ता १ ली च्या पटात लक्षणीय वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत , गावातील अंगणवाडी व बालवाडी यांना शिक्षकांनी भेट देऊन त्यातील इयत्ता पहिलीमध्ये दाखल पात्र विद्यार्थी यादी घ्यावी व त्यांचा प्रवेश करून घ्यावा , जिल्हा परिषद शाळांमधील सोयी सुविधा , शिष्यवृत्ती , विविध उपक्रम याबाबत पालकांना माहिती द्यावी अशा सूचना शिक्षकांना दिल्या . त्यांनी विदयार्थ्यांशी संवाद साधताना त्यांना जीवनात असलेले शिक्षणाचे महत्व पटवून दिले . शाळेतील विदयार्थ्यांची संख्या वाढण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले . पुढे बोलताना त्यांनी विदयार्थ्यांचा शिक्षणाबरोबरच कला , क्रीडा , आरोग्य असा सर्वांगीण विकास व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली . शिक्षकांबरोबरच गावातील इतर उच्चशिक्षित नागरिकांनी विद्यार्थ्यांना



स्पर्धा परीक्षा , सामान्य ज्ञान याबाबत मार्गदर्शन करावे तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांचे महत्व सांगून वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले .

तहसीलदार शेळके यांनी फार्मर आयडी , जिवंत ७/१२ मोहीम , विविध शासकीय योजना , संजय गांधी निराधार योजना ,श्रावण बाळ योजना , ग्रामस्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले . तसेच त्यांनी गावागावात विविध शिबिरे घेऊन गावातच लोकांना त्यांची कामे पूर्ण करून द्यावी , असे आवाहन केले . शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करणे बाबत मार्गदर्शन केले . तसेच शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले . शेतकऱ्यांचे प्रश्न गाव पातळीवरच मिटवून त्यांना न्याय देण्यात यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले . केंद्रप्रमुख आजिनाथ हाडूळे यांनी प्रस्तावना करताना शाळेविषयी आणि एकंदरीतच गावाविषयी सविस्तर माहिती दिली . वांगी हे गाव निसर्गाच्या कुशीत वसलेले गाव असून चारही बाजूने डोंगरांनी वेढलेले गाव आहे . आजकाल दळणवळणाच्या सुविधा दिसून येत असल्या तरी यापूर्वी अशा सुविधा नव्हता . तथापि अशा प्रतिकूल परिस्थितीतून सुद्धा या गावाने अनेक नोकरदार , अनेक अधिकारी कर्मचारी , डॉक्टर , इंजिनिअर घडविले असल्याचे त्यांनी सांगितले .

तहसीलदार शेळके विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधताना त्यांच्या अडचणी, तक्रारी समजावून घेतल्या व त्याचे निरसन करण्याची शाश्वती दिली . उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबद्दल माहिती दिली . विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सर्व शिक्षक प्रयत्नांची पराकष्ठा करत असून या शाळेमधून अनेक गुणवंत विद्यार्थी घडत आहेत असे सांगितले . कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्फूर्त प्रतिसाद होता . त्यांनी शाळेत मध्यान्ह आहार उत्तम असतो , शाळेत मोफत पुस्तके मिळतात इ. माहिती दिली .

ग्राम महसूल अधिकारी राधिका बहीर यांनी नमूद केले की गावातील सर्व नागरिकांना , शेतकऱ्यांना वेळेवर सुविधा पुरविण्यात येतात . सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा . तसेच जिवंत सातबारा मोहीम दोनचा लाभ घ्यावा . सध्या महाराजस्व अभियान सुरू आहे , त्या अनुषंगाने महसूल विभागाच्या अनेक योजनांचा आपण लाभ घेऊ शकता , असेही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास ग्राम महसूल अधिकारी राधिका बहीर , अशोक वाघमारे , केंद्रप्रमुख आजिनाथ हाडूळे , मुख्याध्यापक निरंजन धनवे , मुख्याध्यापक निरंजन धनवे , अशोक वाघमारे , बाबुराव शेळके ,महादेव शेळके , शिक्षक आनंद शिंदे , सी.एस.सी.चालक रोहित राऊत , इतर शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## वैभवी देशमुखच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारली-डॉ.मेटे

बीड (सरकार): मस्साजोग गावचे दिवंगत सरपंच स्व. संतोष देशमुख यांची कन्या वैभवी हिने नीट परीक्षेत घवघवीत यश संपादन केली आहे. अत्यंत खडतर परिस्थितीत आणि आपल्या पित्याचे छत्र हरपल्या नंतर देखील जिद्द आणि चिकाटीने तिने हे यश मिळवले.



तिच्या भविष्यातील शिक्षणासाठी राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस साहेब यांनी सहकार्य करून पुढाकार घ्यावा अशी विनंती शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी केली होती त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून वैभवीच्या पुढील शिक्षणासाठी आपण मदत करणार असल्याचे सांगितले आहे.

मस्साजोग सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या निघृण हत्ये नंतर संपूर्ण देशमुख कुटुंबाचे छत्र हरवले होते. यातच त्यांची कन्या वैभवी ही १२ वी वर्गात शिकत असताना तिला अत्यंत बिकट परिस्थितीत परीक्षेला सामोरे जावे लागले यातच तिने नीटची ही परीक्षा दिली होती यात तिला घवघवीत यश मिळाले असून आता पुढील शिक्षणाचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वैभवीच्या पुढील वैद्यकीय शिक्षणाची जबाबदारी घ्यावी अशी विनंती केली होती. याला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शवली आहे. डॉ.ज्योती मेटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करत वैभवी देशमुख हिस यासंदर्भात माहिती दिली आहे. आयुष्याच्या विविध क्षेत्रात भरभरून यश मिळो आणि आपल्या पित्याचे स्वप्न पूर्ण करण्याचे बळ मिळो अशा शुभेच्छा ही दिल्या आहेत.

## ७० वर्षे जनता जनार्दनाची सेवा करता आली याचा मनस्वी आनंद-माजी मंत्री शिवाजीराव पंडित

बीड (सरकार) बीड जिल्ह्यात आपण ७० वर्षे समाजकारण आणि राजकारण केले. गेवराई तालुक्यातील जनतेसह जिल्ह्यातील जनतेची मनोभावे सेवा केली. गेवराई तालुक्यातील जनतेसाठी विविध विकासाची कामे करता आली याचा मनस्वी आनंद आहे. परमेश्वराच्या कृपेने आणि जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने आपल्याला खूप मिळाले. जनतेची सेवा करण्याची संधी मिळाल्याचा आनंद आपल्याला आहे. सध्याचे राजकीय वातावरण दूषित झाले आहे. जातिवाद मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सामाजिक स्वास्थ सुधारण्यासाठी राजकारणासह सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत, असे प्रतिपादन माजीमंत्री तथा बीड जिल्ह्यातील राजकीय भीष्माचार्य शिवाजीराव दादा पंडित यांनी केले.

बीड येथे राष्ट्रमाता जिजाऊ प्रबोधन मंडळ व सेवानिवृत्त जेष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने शिवाजीराव पंडित यांचा सोमवार दिनांक १६ जून रोजी



सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिवाजीराव दादा पंडित बोलत होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित म्हणाले, महाराष्ट्राचे भाग्यविधाते आमचे राजकीय गुरू. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या दिग्गज राजकीय मार्गदर्शकांच्या नेतृत्वाखाली आम्ही राजकारण आणि समाजकारण केले. ७० वर्ष गोरगरीब जनतेचे सेवा केली. गेवराई तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला. आजचे राजकीय वातावरण दूषित झाले आहे. लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. राजकारणात जातीयवाद वाढला. जाती जातीमध्ये वाद वाढला आहे. ही उपस्थिती सुधारण्याची आज गरज निर्माण झाली आहे. आपण गेवराई तालुक्यात साखर कारखाना व्हावा, यासाठी त्याकाळी आमदारकी लढता माजी उपमुख्यमंत्री मंत्री स्वर्गीय सुंदरराव सोळंके यांना बिनविरोध आमदार केले. आमदार होताच आठ दिवसात कारखान्याला मंजुरी आली होती, याची आठवणही त्यांनी यावेळी करून दिली. गेल्या ७० वर्षातील राजकारणातील आणि समाजकारणातील विविध आठवणी त्यांनी याप्रसंगी सांगितल्या.

यावेळी प्रा. मुकुंद काळे, पत्रकार नागरे नाना, नारायण हाडोळे आदींनी आदरणीय दादांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त करून गौरवोद्गार काढले. यावेळी उपस्थित सर्वांनी दादांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमास हरिश्चंद्र चव्हाण, राजाभाऊ हाडे, रमेश बुरंगे, सीताराम मुळे, राजाभाऊ कुटे, पिंपळे, डावकर, शिवाजी गुंजाळ, सुरवसे, राजापुरे, शिवाजी देसाई आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार साहित्यिक दादासाहेब सादोळकर यांनी केले.

## सौ. के.एस.के. उर्फ काकू कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्यांनी केले पिंपरगव्हाण येथे माती परीक्षण प्रात्यक्षिक



बीड (सरकार): वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी मान्यताप्राप्त सौ. केसरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के) उर्फ काकू कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी ग्रामीण कृषी जागरूकता व कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पिंपरगव्हाण येथे केले माती परीक्षण प्रात्यक्षिक.

याप्रसंगी विद्यार्थिनींनी माती परीक्षण म्हणजे काय? माती परीक्षणाने मातीमध्ये कोणती पोषकद्रव्ये (नायट्रोजन, फॉस्फरस,पोटॅश) आहेत आणि कोणती कमी आहेत हे कळते, अंदाजे नव्हे तर मातीच्या गरजेनुसार खत देऊन खर्च वाचवता येतो. जमिनीच्या योग्य व्यवस्थापनामुळे भरघोस पीक येते, मातीची गुणवत्ता वाढते ,शाश्वत शेतीस चालना मिळते. असे काही मुद्दे शेतकऱ्यांसमोर स्पष्ट केले आणि माती परीक्षण कसे करायचे ते प्रात्यक्षिक कृतीतून गावातील नागरिकांना समजावून सांगितले. यावेळी कृषी कन्या चव्हाण आसावरी, डोके आरती, परजने गिताश्री, परजने वैष्णवी, पवळ साक्षी, उगले सुप्रिया, पवळ उषा व मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांनी सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंखे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी.मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ.एस.टी. शिंदे, प्राचार्य .बी.आर.चादर व महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## भगवानगडाचे मठाधिपती डॉ.नामदेवशास्त्री महाराज यांच्याकडून आंधळे कुटुंबियांचे सांत्वन

बीड (सरकार)भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी सोमवार दि.१६ जून रोजी माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कमलाकर आंधळे यांच्या निधनामुळे त्यांच्या बीड येथील निवासस्थानी भेट देऊन डॉक्टर आंधळे कुटुंबीयांचे सांत्वन केले.

बीड तालुक्यातील हिंगणी येथील मुळचे रहिवासी असलेले स्व.डॉ. कमलाकर आंधळे यांचे कुटुंबीय हे वारकरी संप्रदाय आणि संत भगवान बाबा यांच्यावर नितांत श्रध्दा असलेले कुटूंब आहे. यावेळी आंधळे कुटुंबीय, संत भगवानबाबा आणि भगवानगड यांच्या आठवणीला महंत डॉ. नामदेवशास्त्री महाराज, डॉ. सुधाकर आंधळे आणि त्यांची बहीण यांनी उजाळा दिला.यावेळी आंधळे कुटुंबीय व नातेवाईक उपस्थित होते.



## उपविभागीय अधिकारी कार्यालयाचा अजब कारभार

### उपोषणकर्त्यांची घेतली जात नाही दखल

माजलगाव (सरकार) माजलगाव उपविभागीय कार्यालय येथील उपविभागीय अधिकारी यांना निवेदन करते व तक्रारदार यांच्या तक्रार निवारणासाठी वेळच नसतो, निवेदन देऊन व वरिष्ठांचे आदेश असताना देखील कारवाईस या कार्यालयाकडून दिरंगाई होते यामुळे वारंवार या कार्यालयाचे खेटे मारण्याची वेळ सामान्यावर व नागरिकांवर येत आहे.

तालुक्यातील पात्रुड येतील गट नंबर १०६ ही जमीन श्रीराम मंदिर बीड या नावाने असून या जमिनीवर बेकायदेशीरपणे खरेदी-विक्रीचे रॅकेट चालू असून बेकायदेशीर खरेदी विक्री करणाऱ्या वर व अतिक्रमण धारकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे यासाठी माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले होते. या निवेदनातील मागण्याची दखल घेत मा. जिल्हाधिकारी बीड यांनी दि. २२/४/२०२५ रोजी च्या बेमुदत धरणे आंदोलनास शासन नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल असे तक्रारदारांना व निवेदनकर्त्यांना अवगत करत उपोषणापासून परावृत्त केले होते. परंतु यावर कुठल्याही प्रकारची कारवाई केली न गेल्यामुळे दि. २६/५/२०२५ रोजी या प्रकरणाची दखल न घेतल्यामुळे उपविभागीय अधिकारी



माजलगाव यांना या संदर्भात निवेदन देत माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने याप्रकरणी दि.१६/६/२०२५ रोजी बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता परंतु पात्रुड येथील सर्वे नं/ गट नं. १०६ मधील ४ हे.७१ आर. या जमिनीवर श्रीरंग मारुती बारवकर या व्यक्तीने एक बोरवेल पाडून त्याचा फेरफार आपल्या नावावर लावून या जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे. ही अतिक्रमणित जागा हा व्यक्ती प्लॉटिंगच्या नावावर बेकायदेशीरपणे विक्री करत आहे. त्यामुळे अतिक्रमण धारकांना व खरेदी विक्री करणाऱ्या वर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे निवेदन देण्यात आलेले होते परंतु आज तगायत याप्रकरणी अतिक्रमण धारकांना व बेकायदेशीर विक्री करणाऱ्या व घेणाऱ्या वर कसल्याही प्रकारची कारवाई उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्याकडून केली गेली नसल्यामुळे आज दि. १६/६/२०२५ पासून माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने उपविभागीय कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे. याप्रकरणी लवकरात लवकर कारवाई न केल्यास आंदोलन हे चालूच राहणार आहे असे तक्रारदारांच्या वतीने सांगण्यात आली आहे.

## डॉ.संतोष मुंडे यांच्या हस्ते नीट परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थींचा सत्कार

परळी (सरकार) नीट परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून परळी वैद्यनाथ च्या विद्यार्थ्यांनी निकालाच्या माध्यमातून परळीच्या मुकूटात मानाचा तुरा रोवला आहे. येथील विद्यार्थीनी कु.सिद्धी पिता डॉ.आनंद टिंबे, कु वेदिका वैजनाथ तांबडे, कु व्यास वैजनाथ तांबडे या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे. या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालय, उपाध्यक्ष, डॉ. संतोष मुंडे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या नीट परीक्षेत परळी येथील कु.सिद्धी पिता डॉ.आनंद टिंबे, कु वेदिका वैजनाथ तांबडे, कु व्यास वैजनाथ तांबडे या विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे.



कु.सिद्धी आनंद टिंबे हिने अतिशय जिद्द आणि परीश्रमातून चइइड प्रवेश पूर्व परीक्षा छएएढ मध्ये ५५७ मार्क घेत राष्ट्रीय स्तरावर ९५४९ वी रँक मिळवली. तर दोघे बहीण भाऊ यांनी चि व्यास वैजनाथ तांबडे यांनी छएएढ २०२५ मध्ये ५७३ तर कु वेदिका वैजनाथ तांबडे हिने ४८५ गुण घेऊन यश संपादन मिळवले आहे. या सर्वाचा श्रीनाथ हॉस्पिटल येथे महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालय, उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांच्या हस्ते बारा ज्योतिर्लिंगापैकी एक श्री प्रभू वैद्यनाथाची प्रतिमा भेट देऊन सत्कार करून कौतुक करत पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. परळीच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत प्रथमच मोठे यश मिळाले असून या यशामुळे परळीचा शैक्षणिक दृष्टीकोनातून नावलौकिक वाढला आहे. यावेळी मित्र परिवार उपस्थितीत होते.

## सासुरवाडीतच जावयाला मारहाण; ५ जणांवर गुन्हा

बीड (सरकार): पत्नीला नांदायला घेऊन जाण्यासाठी सासुरवाडीत आलेल्या जावयाला बेदम मारहाण करून त्याच्यावर चाकूने वार करून जखमी करण्यात आल्याची घटना आष्टी तालुक्यातील चिंचोली येथे घडली. याप्रकरणी पत्नीसह सासुरवाडीच्या पाच जणांविरोधात शुक्रवारी अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परमेश्वर मोहन साबळे(४२, रा.शास्त्रीनगर, केडगाव, जि.अहिल्यानगर) असे मारहाणीत जखमी झालेल्या जावयाचे नाव आहे. त्यांनी अंभोरा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार त्यांची पत्नी कालिंदा साबळे ही काही दिवसांपासून चिंचोली येथे माहेरी आलेली आहे. तिला सासरी घेऊन जाण्यासाठी २ जून रोजी परमेश्वर हे चिंचोली येथे आले होते. यावेळी त्यांना पोपट आबाजी खुडे, प्रशांत आबाजी खुडे, मालन बाळासाहेब गायकवाड, वैजनाथ आबाजी खुडे आणि पत्नी कालिंदा साबळे यांनी शिवीगाळ करून मारहाण केली. त्यांच्या उजव्या पायाच्या मांडीवर चाकूने वार करून जखमी केले.

## यशवंत विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

बीड (सरकार)यशवंत विद्यालय या शाळेत शैक्षणिक वर्ष २०२५- २६ चा प्रवेश



उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा यशवंत माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नामदेव वाघ हे उपस्थित होते.

यावेळी नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप करण्यात आले.याप्रसंगी गणेश वाघ यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी शिस्तीचे व नियमाचे पालन करावे.नियमित अभ्यास करावा.कठीण परिश्रमा शिवाय यश मिळत नाही.अभ्यासामध्ये सातत्य असणे आवश्यक आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)